संसदीय कार्य विभागातंर्गत खरेदीसाठी समिती गठीत करणे.

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक - यंत्रसा- १०१७/प्र.क्र.९१/तीन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - १८ सप्टेंबर, २०१७.

वाचा- १) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५.
२) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. संकीर्ण२०१५/प्र.क्र.१७१/अर्थ-३, दिनांक १६ जानेवारी, २०१६.
४) शासन निर्णय संसदीय कार्य विभाग, क्र. यंत्रसा-१०१५/प्र.क्र.४/तीन, दिनांक १८ जानेवारी, २०१६.

प्रस्तावना :-

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीबाबत निर्गमित केलेले यापूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक २ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीबाबत सुधारित नियम पुस्तिका निर्गमित केली आहे. यास्तव या विभागाच्या संदर्भाधीन अनु क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये या विभागासाठी गठीत करण्यात आलेली खरेदी समिती बरखास्त करण्यात येऊन, उक्त सुधारित नियम पुस्तिकेतील प्रकरण क्रमांक २.९.३ मध्ये नमूद केल्यानुसार, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (खुद्द) यांना लागणा-या कार्यालयीन वस्तूंची खरेदी करण्यासाठी संसदीय कार्य विभागाच्या सह/उप सचिव यांच्या अध्यक्षतेखाली खरेदी समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

संदर्भाधीन अनु क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये उद्योग, उर्जा व कामगार विभागाने प्रसिद्ध केलेल्या नियमपुस्तिकेमधील प्रकरण क्रमांक २.९.३ मध्ये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार कार्यालयीन वस्तूंची खरेदी प्रक्रिया पार पाडण्यासाठी संसदीय कार्य विभागासाठी खालीलप्रमाणे खरेदी समिती गठीत करण्यात येत आहे :-

खरेदी समितीची रचना

- १. संसदीय कार्य विभागाचे सह/उप सचिव : अध्यक्ष
- २. उद्योग संचालनालयाचे प्रतिनिधी : निमंत्रित
- ३. लेखा व कोषागारे संचालनालयाचे प्रतिनिधी : निमंत्रित
- ४. अवर सचिव (संसदीय कार्य विभाग) : सदस्य सचिव

२. तसेच, उक्त नियम पुस्तिकेतील प्रकरण क्रमांक २.१० मधील तरतूदीनुसार संसदीय कार्य विभागाच्या वतीने पुरवठादाराबरोबर करार करण्यासाठी अवर सचिव (गट-अ), संसदीय कार्य यांना नामनिर्देशित करण्यात येत आहे.

३. नियम पुस्तिकेतील प्रकरण क्रमांक २.९ मधील तरतूदीनुसार उक्त समितीने त्यांचे वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत खरेदी प्रक्रिया राबवावी. तसेच, दरपत्रकाच्या आधारे ३ लाखापर्यंतच्या खरेदीस उपरोक्त समितीची मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१८१७५८४१०७१५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramesh Sakharam Sarfare

Digitally signed by Ramesh Sakharam Sarfare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Parliamentary Affairs, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=52e560d0b76dfea3392e26761deeb6b2efc5f1bea42c0dffdc1d69d316ae65a8, serialNumber=0c7001609c3ef1f1a1774b5223846fb28e7bf476529c879e1fd04746bfa60fd7, cn=Ramesh Sakharam Sarfare
Date: 2017.09.18 17:49:39 +05'30'

(र.स.सरफरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१ महालेखापाल महाराष्ट्र - १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२ महालेखापाल (लेखापरीक्षा), मुंबई.
३ संचालक, लेखा व कोषागारे, नविन प्रशासकीय इमारत, मुंबई-४०००३२.
४ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५ निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६ उप सचिव (उद्योग-४), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
७ संचालक, उद्योग संचालनालय, नविन प्रशासकीय इमारत, मुंबई- ४०० ०३२.

८ प्रधान सचिव (संसदीय कार्य), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
९ उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३), मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१० उप सचिव, संसदीय कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
११ अवर सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१२ सर्व कक्ष अधिकारी, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१३ निवड नस्ती.